
महासागर
रविवार, दि. 9 मार्च 2025
अमरावती
पान 3




धारणी- शेतकऱ्यांच्या जीवनातील हा प्रवास जरी कठीण असला तरी त्याच्या बरोबर, त्याच्या सदैव पाठीशी 'ती' सक्षमपणे उभी आहे. ( छाया-दिनेश सोनोने)

# दोन्ही महात्मे तोलामोलाचे मग वाद कशाला?

प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज, डॉ.भाऊसाहेब देशमुख दोन्ही जिल्ह्याचे रत्नच!








## अमरावती विमानतळाच्या नामकरण प्रस्तावावर काय म्हणाले दिग्गज

*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती,( दि.8 )- नवनिर्मीत अमरावती ( बेलोरा ) विमानतळाला देशाचे पहिले कृषीमंत्री भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याचा प्रस्तावाला जवळजवळ अंतिम मंजूरी मिळणार असताना प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांचे नाव या विमानतळाला देण्यात यावे असा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला. ज्यावर गुरुवारी चर्चाही करण्यात आली. मात्र जिल्ह्यात दोन्ही महान विभूतींचे समर्थक मात्र नामरणाच्या प्रस्तावावरुन समाजमाध्यमांवर रस्सीखेच करताना दिसत आहे. दोन्ही महात्मे तोलामोलाचे आणि जिल्ह्याचे अमूल्य रत्न असल्यामूळे कोणत्याही नामकरणावरुन वादच होवू नये असे अनेकांचे म्हणणे पडले आहे.*

दैनिक महासागर ने याबाबतीत जिल्ह्यातील काही दिग्गज व्यक्तींच्या प्रतिक्रीया मिळविल्या, ज्यामध्ये अनेकांनी चुप्पी साधत वादात पडायचा नाही, अशीच भूमिका घेतली. आणि मूळातच दोन्ही महान व्यक्ती असल्यामूळे या नामकरण प्रक्रीयेमध्ये वादच निर्माण होवून असे वैयक्तीक मत व्यक्त केले.

बेलोरा विमानतळापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या लोणी टाकळी हे ज्ञानेश कन्या संत गुलाबराव महाराजांचे जन्मगाव आहे. तर तेथून काही अंतरावर शिक्षण महर्षी भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचेही मुळगाव आहे. विमानतळाचे काम सुरु असतानाच या विमानतळाला डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी अनेकांनी केली होती. ज्यामध्ये विद्यमान खासदार बळवंत वानखडे यांनी तर केंद्रात सततचा पत्रव्यवहार करुन त्याचा पाठपुरावा केला. डॉ.पंजाबराव देशमुखांचे नाव विमानतळाला मिळणार असे वाटत असताना प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळात पोहचल्याने नामकरण प्रक्रीयेला स्पर्धेचे रुप आले आहे.

### प्रस्ताव कुणी पाठविला हेच माहित नाही



संत गुलाबराव महाराजांचे नाव विमानतळाला देण्यात यावे, हा प्रस्ताव राज्य शासनाकडे कुणी सादर केला हेच माहित नाही. ज्यांनी कुणी दिला असेल, तो फक्त प्रस्ताव आहे. त्याला अजून मान्यता मिळालेली नाही. मात्र दोन्ही महान व्यक्ती आपल्याकरिता महत्वाच्या आहे. त्यामूळे विमानतळ नामकरणाकरिता वाद होवू नये असे मला वाटते.

**सुलभा संजय खोडके,**
**आमदार अमरावती विधानसभा मतदारसंघ**

### माझी पुर्वीपासून मागणी होती



देशाचे पहीले कृषीमंत्री आणि देशाच्या घटनासमितीमध्ये ज्यांचा समावेश होता, असे डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव बेलोरा विमानतळाला देण्यात यावे ही मागणी मी पुर्वीपासून केली आहे. अनेकदा पंतप्रधानांपासून तर मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांशी पत्रव्यवहार करुन भाऊसाहेबांचेच नाव विमानतळाला मिळेल याकरिता प्रयत्न केला. त्यामूळे भाऊसाहेबांचेच नाव विमानतळाला देण्यात यावे.

**बळवंत वानखडे,**
**खासदार, अमरावती.**

### महाराजांचे नाव मिळाल्याच आनंदच होईल



भाऊसाहेब देशमुख असो किंवा गुलाबराव महाराज असो हे दोन्ही व्यक्ती श्रेष्ठ आहे. त्यांचे नाव बेलोरा विमानतळाला मिळणे म्हणजे हे त्या विमानतळाचे भाग्य असेल. गुलाबराव महाराज हे संत परंपरेमधील श्रेष्ठ संत आहे. त्यांनी नेहमी समन्वयाचा विचार आपल्या साहित्यातून मांडला आहे. धर्माबरोबरच वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासून त्यांनी देशाची प्रगती कशी साधता येईल यावरही लिखाण केले आहे. एक अभ्यासक म्हणून व गुलाबराव महाराजांची भक्त म्हणून त्यांचे नाव विमानतळाला मिळाले तर आनंदच वाटेल.

**-डॉ.नयना कडू,**
**संत गुलाबराव महाराज यांच्या साहित्याच्या अभ्यासक.**


### वादच होवू नये



शिक्षण क्षेत्रात भाऊसाहेबांची भरिव कामगिरी आहे. विमानतळापासून त्यांचे गाव पापड जवळच आहे. आणि भाऊसाहेबांच्या नावावर जवळजवळ शिक्कामोर्तब झालेला असताना स्पर्धा कशाला हवी. आणि दोन्ही महापुरुष हे आपल्याच जिल्ह्यातील आहे. त्यामूळे नामकरणामध्ये वाद उत्पन्न होणेच वास्तवात चुकीचं आहे, असे मला वाटते.

**मंगेश उर्फ पप्पु पाटील,**
**मनसे नेते.**

### ही सुध्दा आनंदाची बाब आहे



अमरावती जिल्हा हा नवरत्नांची खाण आहे. जिल्ह्याला संत परंपरा लाभली आहे. संत तुकडोजी महाराजांचे नाव नागपूर विद्यापीठाला देण्यात आले आहे. संत गाडगे बाबांचे नाव अमरावती विद्यापीठाला देण्यात आले आहे. भाऊसाहेब देशमुखांच्या नावाने इतके मोठे कृषी विद्यापीठ आहे. जन्मत आंधळे असताना शंकराचार्यांनंतर प्रतिभाशाली असे आध्यात्मिक, वैज्ञानिक साहित्य लिहिणारे ज्ञानेशकन्या प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराजांचे नाव जर बेलोरा विमानतळाला मिळत असेल तर ही आनंदाचीच बाब आहे. कालऔघात मागे पडलेले गुलाबराव महाराज यामुळे देशपातळीवर झळकतील, दुसरीकडे भाऊसाहेब देशमुखांना भारतरत्न मिळावे याकरिता आम्ही पाठपुरावा करित आहे. तशी मागणी आम्ही वारंवार केंद्रस्तरावर करित आहे.

**डॉ.अनिल बोंडे, खासदार, राज्यसभा.**

## जप्तीचे घर घेणे ठरले डोकेदुखी

### जुन्या घरमालकाचे अतिक्रमण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.8 )** - टाटा कॅपिटल कंपनीने जप्त केलेले घर खरेदी करणे एका शेतकऱ्याला महागात पडले. शेतकऱ्याने 20 लाख 70 हजार रुपयांना घर घेतले होते. मात्र हे घर जुन्या मालकाने ताब्यात घेतले. यासंदर्भात शेतकरी वैभव प्रकाश चांदूरकर (वय 35, शारदा नगर, अमरावती) यांनी जेएमएफसी न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने राजापेठ पोलिसांनी आरोपी संदीप पांडुरंग बेहरे (34, रा. त्रिमूर्ती नगर, गोपाळ नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सुत्रानुसार, वैभव चांदूरकर शेती व्यवसाय करतात. 2023 मध्ये त्यांनी टाटा कॅपिटल कंपनीने निंभोरा येथील मालमत्तेच्या विक्रीसाठी वृत्तपत्रात जाहिरात पाहिली होती. वैभवने त्या कंपनीशी संपर्क साधून खरेदी करण्याची तयारी दर्शवली. बँक व्यवस्थापक राऊत यांच्याशी संपर्क साधून मालमत्तेची संपूर्ण माहिती घेतली. गोपाळ नगर परिसरातील त्रिमूर्ती नगरात 915 स्केअर फुट जागेत बांधलेल्या घराची एकूण किंमत 20 लाख 70 हजार रुपये होती. वैभवने डीडीद्वारे 2 लाख 7 हजार 500 रुपये, आयएमपीएसद्वारे 3 लाख 13 हजार 750 रुपये, आरटीजीएसद्वारे 15 लाख 63 हजार 750 रुपये फायनान्स कंपनीला दिले. त्यानंतर वैभवला कंपनीकडून विक्री प्रमाणपत्रही मिळाले.

वैभवने कुलूप घेऊन घराला कुलूप लावले. दुय्यम रजिस्ट्रार ऑफिसमध्ये जाऊन खरेदी केलेले घर मिळाले. दरम्यान, 8 फेब्रुवारी 2024 रोजी दुपारी ते घरी गेले असता त्यांना घराला दुसरे कुलूप दिसले. वैभव यांनी आजूबाजूला चौकशी केली असता संदीप बेहरे याने घराला कुलूप लावल्याचे समजले. त्यानंतर संदीप बेहरे यांनी घराचा ताबा घेऊन घरात राहू लागला. वैभवने संदीप बेहरे यांच्याशी बोलून त्यांना बँकेची कागदपत्रे दाखवली आणि ही मालमत्ता खरेदी केल्याबाबत सांगितले. पण संदीप म्हणाला, हे माझे घर आहे, तुला जे करायचे आहे ते कर, त्यानंतर वैभवने जेएमएफसी कोर्टात केस दाखल करून न्याय मागितला. त्यानंतर न्यायालयाने 8 जानेवारी 2025 रोजी आदेश काढले. यामध्ये न्यायालयाने राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले. त्यानंतर वैभव चांदूरकर यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी संदीप बेहरे याच्याविरुद्ध 441 अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## खारतळेगाव येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**अमरावती** - खारतळेगाव येथील अल्पभूधारक शेतकरी भारत पंजाबराव नाईक (वय 58) यांनी कर्ज व नापिकीमुळे त्रस्त होऊन (दि.5) आपली जीवन यात्रा संपवली. मृतक शेतकरी अत्यंत अल्पभूधारक असून त्यांच्या मागे पत्नी,मुलगा, मुलगी, भाऊ असा मोठा आप्तपरिवार आहे. सदर अल्पभूधारक शेतकऱ्याने केलेल्या आत्महत्येमुळे सर्व परिसर व गाव हळहळले आहे.



## वनकर्मचाऱ्याच्या अंगावर ट्रॅक्टर चढविण्याचा प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.8 )** - वनखंडात साठवलेल्या अवैध रेतीवर कारवाई करताना रेती तस्करांनी वनकर्मचार्याच्या अंगावर ट्रॅक्टर चढविण्याचा प्रयत्न केला. या घटनेची तक्रार सहायक वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदिप कैलासराव बावणे (31, रा. शिरखेड) यांनी 7 मार्च रोजी शिरखेड पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अभिजित राजकुमार वानखडे (31, रा. कठवडा, ता. मोर्शी) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. सहायक वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदिप बावने यांच्या तक्रारीनुसार, ते बिट कर्मचार्यासोबत वनखंड क्रमांक 819 च्या कवढाळा बिटमध्ये गस्तीवर होते. दरम्यान त्यांना एका ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये रेती भरली जात असल्याचे दिसले. त्यामुळे त्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा सुरु केला असता, तेथे ट्रॅक्टर मालक आला आणि हा माझा ट्रॅक्टर आहे, तुम्ही वनविभागाचे कर्मचारी आहे, तुम्हा माझ्यावर कारवाई करू शकत नाही. मी तुम्हाला मारून टाकेन, अशी धमकी वनकर्मचार्यांना दिली. त्यानंतर त्याने शिविगाळ करून चार वनकर्मचार्यांसोबत धक्काबुक्की केली आणि ट्रॅक्टर वनकर्मचार्यांच्या अंगावर चढविण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने वनकर्मचारी बाजुला झाले. अन्यथा मोठा अनर्थ होण्याची शक्यता होती. या घटनेनंतर वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदिप वावणे यांनी शिरखेड पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

## विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान






*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती, ( दि.8 )- जिल्हा प्रशासनातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित वॉकथॉनमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच समारोपीय कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान करण्यात आला.*




### वॉकथॉनमध्ये महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

विभागीय क्रीडा संकुलात आयोजित कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, डॉ. मोनिका कटियार, विभागीय महिला बालकल्याण अधिकारी विलास मसराळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुनील सोसे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन वॉकथॉनला हिरवी झेंडी दाखविली. त्यानंतर विभागीय क्रीडा संकुल, इर्विन चौक, मदर टेरेसा मार्ग, गर्ल्स हायस्कूल चौक, शिवाजीनगरमार्गे परत विभागीय क्रीडा संकुल स्टेडियम



रॅलीचा समारोप करण्यात आला. वॉकथॉनमध्ये महिला सुरक्षा आणि स्त्री-पुरुष समानता याबाबत जनजागृती करण्यात आली. परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत सुप्रिया गजभिये, सुषमा वानखडे, प्रणिता तागडे, सीमा कोरडे, शामू दारसिंबे, सरिता किल्लेदार, निकिता पवार, जयश्री मानकर, वर्षा वानखडे, नीलाक्षी दर्यापूरकर, मनीषा टवलारे, स्वामिनी तायडे, ईश्वरी गांजरे, मनोरमा गायकवाड, रेणूका सपाटे, छाया काळमेघ यांचा सत्कार करण्यात आला.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गावातच मिळाला रोजगार, मात्र मजुरीसाठी फिरावे लागते दारोदार!

## आदीवासींकरिता महत्वाचा सण होळीच्या रंगात भंग



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.8 )** – मेळघाटातील गावातील मजुरांना गावातच रोजगार मिळावा यासाठी रोजगाराची हमी असलेला कायदाच तयार करण्यात आला. त्यामूळे मजूरांच्या हाताला गावातच मोठ्या प्रमाणात कामे मिळाली, उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटू लागला आहे. परंतू ज्या हातांनी कामे केली, त्या हातात मजूरीचा पैसा कधी पडणार, असा सवाल केल्या जात आहे. मेळघाटातील आदीवासींकरिता सण शिरोमणी असलेल्या होळीच्या रंगात मजूरीअभावी भंग पडतो की, काय? अशी भीती निर्माण झाली आहे.

तीन ते चार महिन्यापासून रोजगार हमी योजनेच्या आदिवासी मजुरांची मजुरी थकली असल्याने हातावर पोट भरणाऱ्या मजुरांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. होळीकरिता आदिवासी मजूरांना पैश्याची जुळवाजुळव करावी लागत आहे. 15 दिवसांच्या आत मजुरांना मजुरी मिळावी असा निकष आहे. मात्र तिन ते चार महिने लोटूनही मजुरी न मिळाल्याने मजुरांना आर्थिक बाब भेडसावत आहे. मेळघाटात रोजगार हमी योजनेची कामे शासन नियमाप्रमाणे रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामाची मजुरी काम पूर्ण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. मात्र, असे असताना देखील मेळघाट अंतर्गत रोहयो कामाची मजुरी गेल्या तीन महिन्यांपासून थकल्याने या शासकीय योजनेच्या आशेवर असलेल्या अनेक आदिवासी मजूर कुटुंबांची होळी अंधारात जाणार कि काय असी भिती वाटत आहे. मेळघाटातील रोजगार हमी योजनेतील कामगारांनी आपली हक्काची मजुरी मिळवण्यासाठी मजुरांची मजुरी ही शासन स्तरावर प्रलंबित आहे. मेळघाटातील ग्रामपंचायती अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून वृक्षलागवड तसेच खड्डे खोदकाम करण्यात आले होते. हे काम पूर्ण होऊन तिन ते चार महिन्यांचा कालावधी लोटला, मात्र, मजुरांना अद्याप या कामाची मजुरी मिळालेली नाही. काम पूर्ण झाल्यानंतर आपल्या पैशासाठी मजुर वर्ग वाट बघत आहे. परंतु त्यांना कामाचा मोबदला शासनाकडून अद्याप देण्यात आलेला नाही. त्यामूळे ऐन होळीच्या तोंडावर आदीवासी मजूरांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

### 50 कोटींची मजुरी शासन दरबारी थकीत

**धारणी**– मेळघाटात सध्या काही दिवसांवर आलेल्या होळी सणाची लगबग सुरू आहे. आदिवासींचा सर्वात मोठा सण होळी आहे. हा सण आदिवासी बांधव मोठ्या उत्साहात साजरा करतात. मात्र मनरेगा योजनेतील आदिवासी मजुरांची 50 कोटींची मजुरी शासन दरबारी थकीत आहे. म्हणून या वेळेस ची आदीवासी बांधवांची होळी अंधारात जाते की काय, अशी भीती वाटत आहे. आदिवासी बांधव होळीनिमित्त आपल्या मुलं बाळाना नवे कपडे खरेदी करतात आणि मोठ्या उत्साहाने होळी हा सण साजरा करतात. होळीमूळे मेळघाटातील बाजारपेठाही फुलून जात असतात, मात्र मजूरांची मजूर थकीत असल्याने अजूनही होळीच्या बाजाराला पाहीजे तसा रंग चढलेला दिसत नाही.

# पंचवटी ते नवसारी मार्गावर अतिक्रमण विभागाची कारवाही






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** महानगरपालिका अतिक्रमण विभाग व समाज कल्याण विभागाद्वारे संयुक्तपणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही शुक्रवारी (दि.7) करण्यात आली. त्यामुळे शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला. यावेळी जेसीबीचाही वापर करण्यात आला.

याकारवाईत शहरातील झोन क्रमांक 1 अंतर्गत पंचवटी चौक ते गाडगे नगर, गाडगे नगर ते शेगाव नाका, शेगाव नाका ते कठोरा नाकापर्यंत मुख्य रस्त्यावरील नागरिकांद्वारे सार्वजनिक फूटपाथ/नालीवरील सामाजिक न्याय विभाग असे नमूद असलेले गटई स्टॉल लोखंडी खोके, शासनाचे अटी शर्तीचे पालन न करता भाजीपाला, हॉटेल कॅन्टीन, टू व्हीलर वाहन दुरुस्ती गॅरेज, मांस विक्री, पानठेले व काही ठिकाणी हुबेहूब डुप्लिकेट खोके लावून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. या अतिक्रमणामुळे रहदारीस अडचण निर्माण होत असल्यामुळे तातडीने सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश मनपा आयुक्त व मनपा उपायुक्त प्रशासन यांनी दिले. त्यानुषंगाने शुक्रवारी सकाळी 11 ते दुपारी 4.30 वाजेपर्यंत सदर अतिक्रमण जे.सी.बी. मशिनीद्वारे काढण्याची कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाही मध्ये 30 ते 35 गटई स्टॉलदेखील जप्त करण्यात आले आहे. सदर कार्यवाहीमध्ये समाज कल्याणचे विभागाचे प्रतिनिधी, निरीक्षक ऋषिकेश तायडे, अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, शुभम पांडे, ससनर विभागाचे जागा निरीक्षक भांडे, पोलिस कर्मचारी व अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यवाही नियमित सुरू राहाणार असल्याचे यावेळी उपस्थित पदाधिकार्यांनी सांगितले.

# अभय योजनेत पुन्हा लखलखली परिमंडळातील चार हजार घरे

## 31 मार्च पर्यंतच घेता येणार अभय योजनेचा लाभ



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.8 )**– थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांच्या थकबाकीवरील व्याज व विलंब आकाराच्या संपूर्ण माफीसह पुनर्जोडणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या महावितरणच्या 'अभय योजनेत' परिमंडळातील 3 हजार 858 ग्राहकांची घरे पुन्हा प्रकाशमान झाली आहे. या योजनेची मुदत 31 मार्च पर्यंतच असल्याने परिमंडळातील ग्राहकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे.

वीजबिल न भरल्यामुळे 31 मार्च 2024 पुर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या वीज ग्राहकांच्या थकबाकीमुक्तीसाठी सुविधा म्हणून महावितरणने 1 सप्टेंबर 2024 ला 'अभय योजना' अंमलात आणली. मुळ थकबाकी भरल्यानंतर व्याज आणि विलंब आकारात संपूर्ण माफी शिवाय मुळ थकबाकीची 30% रक्कम एकरकमी भरल्यास उर्वरित 70% रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सोय यासोबतच घरगुती व व्यावसायिक ग्राहकांनी एकरकमी थकीत बिल भरल्यास त्यांना 10% अतीरिक्त सवलत आणि उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना 5% अतिरिक्त सवलत यासारख्या अनेक सवलती या योजनेत लागू करण्यात आल्या आहेत.

परिमंडळातील 5 हजार 557 थकबाकीदार ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. तथापि त्यापैकी 3 हजार 858 ग्राहकांची घरे पुन्हा प्रकाशमान झाली असून 1 हजार 699 ग्राहक पुनर्जोडणी न घेता फक्त थकबाकीतून मुक्त झाले आहेत. पुनर्जोडणी घेणाऱ्या 3 हजार 858 ग्राहकांमध्ये अमरावती जिल्ह्यातील 1 हजार 683 ग्राहकांचा समावेश असून यवतमाळ जिल्ह्यातील लाभार्थी ग्राहकांची संख्या ही 2 हजार 175 आहे.

परिमंडळाअंतर्गत अद्याप 41 हजार 984 ग्राहक असे आहेत कि, ज्यांची थकबाकी 10 हजार रूपयापेक्षा जास्त असून ते अभय योजनेत थकबाकीमुक्तीसाठी पात्र आहे. त्यांच्याकडे 95 कोटी रूपयाचे वीजबिल थकल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील 18 हजार ग्राहक असून त्यांच्याकडे 43 कोटी वीजबिलाचे थकीत आहे. त्याचबरोबर यवतमाळ जिल्ह्यात 23 हजार 947 ग्राहकांकडे 52 कोटी थकीत आहे.

### योजनेची मुदत संपल्यानंतर होणार कायदेशिर कारवाई

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेचा मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी त्या जागेवरील वीजबिलाची थकबाकी भरणे बंधनकारक आहे. त्यामुळे मार्च महिन्यानंतर महावितरणकडून कायदेशिर कारवाईला सुरूवात करण्यात येणार आहे. तत्पूर्वी थकबाकीदार ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.



# वृध्दाजवळील 40 हजाराची रोख लंपास

**अमरावती** – एका 60 वर्षीय वृध्दाजवळील कापडी पिशवीतून 40 हजाराची रोख चोराने लंपास केली. ही घटना दर्यापूर शहरातील एसबीआय बॅकेजवळील झेरॉक्स सेंटरजवळ उघडकीस आली. राजेंद्र विठ्ठलराव ढाकरे (61, रा. कोंळबी, ता. दर्यापूर) याच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास दर्यापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी करीत आहे.

# रामापुर ग्रामपंचायत उपसरपंचपदी निलेश दौतोडे



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि. 8 )** – अचलपूर तालुक्यातील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या रामापुर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी निलेश नारायण दौतोडे याची एकमताने निवड झाली.

डिसेंबर 2022 मध्ये झालेल्या रामापूर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अचलपूर बाजार समितीचे माजी सभापती किशोर पटोकार, अशोक बारी यांच्या नेतृत्वातील ग्रामविकास पॅनलने दमदार विजय मिळविला होता.थेट निवडणुकीत सरपंचपदी ज्योती प्रभाकर काळे विजयी झाल्या होत्या तर उपसरपंचपदी आशिक अब्दुल सादिक याची निवड ग्रामपंचायत सदस्यानी सभेत एकमताने केली होती. ठरलेल्यानुसार आशिक अब्दुल सादिक यांनी राजीनामा देऊन पॅनल नेर्तुत्वाला दिलेला शब्द पाळला. त्या नुसार शुक्रवारी (दि.7) ग्रामपंचायत येथे सरपंच ज्योती यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेत रिक्त झालेल्या उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संतोष भाऊराव आठवले, आशिक अब्दुल सादिक, वंदना उमेश मोरे, भारती विनोद कैकाडे, आशिष किसनराव वानखडे, सविता गणेश लिल्हरे, सईदा बी आफिस खा, माया श्रीकृष्ण ठाकरे सदस्यांनी एकमताने उपसरपंचपदी निलेश दौतोडे यांची निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी एस डी जयस्वाल, तलाठी आर वैद्य, ग्रामसेवक एम नवले, कोतवाल सौरभ अग्रवाल यांनी निवडणूकीचे काम पाहीले.



# ध्यान तणावमुक्त जीवनाची संजीवनी - सुप्रिया चकोले

## आजीवन अध्ययन व विस्तार विभागात राज्यस्तरीय कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** – आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जीवनात लहानापासून ते मोठ्यापर्यंत तणाव हा सर्वांना उद्धवतो आणि त्याचा दुष्परिणाम व्यक्तीवर शारीरिक, मानसिक आणि भावनिकरित्या व्याधींच्या स्वरूपात दिसून येतो. यावर न्यूरो सायन्स तज्ञ म्हणतात की, मेंदूमध्ये सिरो टोनीन आणि डोपामीन यांसारख्या आनंददायी संप्रेरकांची ध्यान केल्यास निर्मिती होते. यासाठी ध्यान हे एक सुखी व शांत जीवन संजीवनीचे कार्य करीत असल्याचे प्रतिपादन डॉ. सुप्रिया चकोले यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए. योगशास्त्र, पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी, योगिक सायन्स आणि पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी अभ्यासक्रमाच्यावतीने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि.7) पाचव्या सत्रात योग ~ भावनिक व मानसिक स्वास्थ आणि जीवनशैली व्यवस्थापन जागरूकता या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. नरेश बुराडे उपस्थित होते. यावेळी डॉ. सुप्रिया चकोले पुढे म्हणाल्या, तणाव प्रतिबंधासाठी ध्यान हा सर्वोत्तम उपाय आहे. ध्यान केवळ डोळे बंद करून बसणे नव्हे, तर तो मनाच्या खोलावर जाणारा प्रवास आहे.याप्रसंगी त्यांनी ध्यान करण्याच्या विविध पद्धती समजावून सांगून ध्यानामुळे होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक फायद्याबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. नरेश बुराडे यांनी ध्यानाचे महत्त्व सांगून धावपळीच्या जीवनशैलीत ध्यान हा आत्मशोधाचा मार्ग आहे. तसेच ध्यानामुळे मनशक्ती विकास व मेंदूची कार्यक्षमता वाढते, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आदित्य पुंड यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. राधिका खडके यांनी मानले. कार्यक्रमाला शहरातील योग अभ्यासक, विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

# मंगरुळ दस्तगिर हद्दीत तरुणीचा विनयभंग

**अमरावती** – मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणीचा विनयभंग करण्यात आला. पिडित तरुणीने या घटनेची तक्रार 6 मार्च रोजी मंगरुळ दस्तगिर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी मोहन अंबादास उमाडे (24, रा. झाडा, धामणगाव रेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पुढिल तपास मंगरूळ दस्तगिर पोलीस करीत आहे.

# टेंब्रुसोडा जिल्हा परिषद शाळेत महिला दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.8 )** – जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा टेंब्रुसोंडा जागतिक जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित आमदार नारीशक्ती गौरव सोहळा मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला.

यावेळी प्रमुख वक्ते अरविंद देशमुख, कु.पूर्वा केवटी, सौरभ वाघोडे यांनी महिलांना शिक्षणासंदर्भात तसेच मेळघाट मधील अनुकूल परिस्थितीवर योग्य विषय मार्गदर्शन केले. यावेळी आमदार केवलराम काळे बोलताना ज्या प्रकारे महिलांनी मोठ्या प्रमाणात भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिले त्याचप्रमाणे माझे सुद्धा कर्तव्य आहे की मी सुद्धा महिलांना सर्व योजनांचा लाभ हा महिलांपर्यंत मिळाला पाहिजे हाच दृष्टिकोन पुढे ठेवून या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचा सन्मान करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या यावेळी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा आमदार काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला कार्यक्रमाला उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष रेखा मावसकर ,प्रमुख मार्गदर्शक अरविंद देशमुख, सौरभजी वाघोडे ,पूर्वा केवटी, आप्पाजी पाटील ,कमला काळे, रमेश मावसकर, यशवंत काळे, अनिता बेलसरे (उपसरपंच टेंभ्रूसोंडा), गजानन खडके, शंभू खडके, भैय्या जामुनकर, विठ्ठल हेकडे, सागर शिवहरे, बलदेव खडके, तुळशीराम दहिकर, सुधीर जामुनकर, सुजित भास्कर, अविनाश येवले, आकाश खैरकर, दिनेश चव्हाण, आलोक अलोकार उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश चव्हाण तर आभार प्रदर्शन यशवंत काळे यांनी केले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायतचे सरपंच सदस्य आशा वर्कर अंगणवाडी सेविका व सर्व लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मधुमेही चिमुकल्यांसाठी जिल्हा समान्य रुग्णालयाला इन्सुलीनची उपलब्धता

## खा.डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नांना यश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** – जिल्हा सामान्य रुग्णालयात मधुमेहावर उपचार घेण्यासाठी दाखल होणाऱ्या चिमुकल्या रुग्णांना पुरेशा प्रमाणात इन्सुलीनची व्यवस्था होत नसल्याने त्यांना अडचणींना समोर जावे लागत होते. डायबटिज असोसीएशनचे डॉ.मिलींद जगताप, राजेश पिदडी यांनी ही बाब खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आता जिल्हा सामान्य रुग्णालयातील चिमुकल्या मधुमेही रुग्णांसाठी पुरेशा प्रमाणात इन्सुलीनची उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी अनिल बोंडे यांनी विशेष निधी उपलब्ध करुन दिल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे यांनी डॉ.बोंडे यांचे आभार मानले आहेत.जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी शेकडो रुग्ण दाखल होत असतात. त्यामध्ये चिमुकल्या मधुमेही रुग्णांना पुरेशा प्रमाणात इन्सुलीनची उपलब्ध होत नसल्याने त्यांना विविध अडचणींना समोर जावे लागत होते. ही बाब लक्षात घेता डायबटिक असोसीएशचे राजेश पिदडी यांनी याकरिता खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे इन्सूलीनची उपलब्ध करू

# अनेक वर्षापासून मालमत्ता कर थकबाकीदारांवर आता कारवाईच करा

## मनपा अतिरिक्त आयुक्तांचे सक्त निर्देश

## मालमत्ता कर वसुलीची घेतला आढावा




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** – शहरातील ज्या मालमत्ताधारकांनी अनेक वर्षांपासून मालमत्ता कर भरला नाही, अशा थकबाकीदारांवर आता कारवाईच करा, असे सक्त निर्देश अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी अधिकाऱ्यांना दिले.

शहरातील मालमत्ता कर वसुलीसंदर्भात मनपा मुख्यालयातील सभागृहात शुक्रवारी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी मालमत्ता कर वसुलीची घेतला आढावा घेतला. यावेळी सहायक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दिपीका गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे, कर निरीक्षक, कर वसुली लिपिक उपस्थित होते. या बैठकीत मालमत्ता कर वसुली संदर्भात संबंधीतांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. थकीत कर झोनस्तरासह ऑनलाईन व ऑफलाईन देखील भरला जातो. महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी झोनस्तरावर सुट्टीच्या दिवशी (शनिवारी व रविवारी) विशेष शिबिरे घेण्याची सुचना केली आहे. सोबतच, मोठ्या थकबाकी धारकांची यादी तयार केली जात असून, त्यांच्या मालमत्ता जप्त का करण्यात येऊ नये, अशा नोटीस पाठविण्यात येणार आहेत. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांच्यासह सहायक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दिपीका गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे हे अधिकारी कामाला लागले आहेत.

मालमत्ता धारकांनी आपला मालमत्ता कर भरुन महानगरपालिकेला सहकार्य करावे व जप्ती टाळावी असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी केले आहे. मालमत्ता धारकांना काही अडचणी असल्यास महानगरपालिकेशी संपर्क साधण्याचेही आवाहन यावेळी करण्यात आले.

# जिल्ह्यातील प्रकल्पात पाणीसाठा अर्ध्यावर

## 56 प्रकल्पात 54 टक्के पाणीसाठा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** – उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. अशातच जिल्ह्यातील 56 प्रकल्पात 54.26 टक्के जलसाठा पोहोचला आहे. त्यामुळे उन्हाळ्यातील दिवसांमध्ये जलसंकटाचा सामना करावा लागणार असल्याचे संकेत दिसत आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील सर्वात मोठा अप्पर वर्धा प्रकल्पातील जलसाठा सुध्दा 56.74 टक्क्यावर आला आहे. अमरावती जिल्ह्यात 1 मोठा, 7 मध्यम तर 48 लघु प्रकल्प आहेत. या 56 प्रकल्पातील जलसाठा आता अर्ध्यावर पोहोचलेला आहे. सद्यास अप्पर वर्धा प्रकल्पातील प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा 564.05 दलघमी आहे. याची टक्केवारी 56.74 आहे. तर मध्यम 7 प्रकल्पात 256.24 दलघमी साठा असून, याची टक्केवारी 53.78 आहे. तसेच 48 मध्यम प्रकल्पात 227.01 दलघमी जलसाठा असून, ही टक्केवारी 48.66 आहे.

### जिल्ह्यातील प्रकल्पात असा आहे जलसाठा

| | | |
|---|---|---|
| अप्पर वर्धा | – | 56.74 टक्के |
| शहानुर | – | 67.79 टक्के |
| चंद्रभागा | – | 77.21 टक्के |
| पुर्णा | – | 71.93 टक्के |
| सपन | – | 97.23 टक्के |
| पंढरी | – | 25.86 टक्के |
| बोर्डा नाला | – | 20.05 टक्के |

# धन्य तू माता....

# जिवंत बाळासाठी नऊ महिने मृत बाळ ठेवले गर्भात!

## डॉक्टरांचे नऊ महिने देखरेख ● देवरुप डॉक्टरांनी सुखरूप केली प्रसूती



*महासागर प्रतिनिधी*
*चुरणी,( दि.8 ) - चिखलदरा तालुक्यातील मोथा गावात एक अचंबित करणारी घटना पुढे आहे. एका माते ने आपल्या उदरात असलेल्या एका जुळ्या बाळापैकी एका मृत झालेल्या बाळाला आपल्या गर्भात नऊ महिने ठेवले. दुसऱ्या जिवंत बाळासाठी या माते हा निर्णय घेतला. विशेष म्हणजे देवरुप असलेल्या डॉक्टरांनी या महिलेची नऊ महिने देखरेख करुन सुखरुप यशस्वी अशी प्रसूती केली.*

### 3 किलो 200 ग्रॅम वजनाच्या बाळाला जन्म

डॉक्टरांनी तपासणी करून सदर महिलेला चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. याठिकाणी कर्तव्यावर असलेले डॉ. सतीश प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका सिंधू खानंदे व मनीषा रंगारी यांनी सायंकाळी 3 वाजून 25 मिनिटांनी सुखरूप प्रसूती केली. यामध्ये महिलेने सोनोग्राफी रिपोर्ट नुसार एका जिवंत बाळासह एका मृत बाळाला जन्म दिला. ज्यामध्ये जिवंत बाळाचे वजन 3 किलो 200 ग्राम होते सध्या महिला आणि तिचे बाळ सुखरूप असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली. या महिलेची सुखरूप प्रसूती व्हावी यासाठी मोथा उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.निता नागले, आरोग्य सेविका हिना सौदागर, प्रविणा धाकडे, आशा सेविका शेवंता शेळके यांनी वेळोवेळी लक्ष देऊन मोलाची भूमिका बजावली.

### उदरात ठेवणे एकमात्र पर्याय

चिखलदरा तालुक्यातील सलोना प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येत असलेल्या मोथा गावातील जोखमीची माता म्हणून नोंद असलेली भाग्यश्री संजू बेलसरे या गर्भवती महिलेची पाचव्या महिण्यात सोनोग्राफी केली असता महिलेच्या पोटात एक गर्भ जिवंत तर एक गर्भ मृत असल्याचे दिसून आले. व दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने त्या महिलेला नऊ महिन्यापर्यंत मृत बाळाला पोटात ठेवणे आवश्यक झाले होते मात्र त्या महिलेची प्रसूती होईपर्यंत नऊ महिन्यापर्यंत सुखरूप ठेवणे आरोग्य कर्मचाऱ्यांपुढे आव्हान उभे ठाकले होते. अश्यातच डॉ. साजन वर्मा यांनी सदर महिलेची प्रसूती होईपर्यंत वेळोवेळी काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे मोथा उपकेंद्रातील आरोग्य कर्मचारी त्या महिलेची प्रसूतीकाळात दर आठवड्यात तपासणी करत होते. अश्यातच ता 4 मार्च रोजी महिलेला प्रसवकळा सुरू झाल्याची माहिती आशा सेविका यांनी मोथा उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.नीता नागले यांना देण्यात आली.

या महिलेच्या पाचव्या महिण्यात सोनोग्राफी केल्यानंतर एक गर्भ जिवंत तर एक गर्भ मृत असल्याची माहिती डॉक्टरांना समजताच नऊ महिन्यापर्यंत महिलेवर लक्ष ठेऊन सुखरूप प्रसूती करण्याचे आरोग्य कर्मचाऱ्यांपुढे मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र आरोग्य कर्मचाऱ्यांनी हार न मानता महिलेवर नऊ महिन्यापर्यंत लक्ष केंद्रित करून (ता.4 मार्च) रोजी चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयात सुखरूप प्रसूती केली. आज तिचे बाळ आणि ती महिला दोघेही सुखरूप आहे.

**डॉ.नीता नागले**
**वैद्यकीय अधिकारी,**
**मोथा उपकेंद्र.**



# किमान वाचन, गणितासाठी शासनाचा कृती कार्यक्रम

### विद्यार्थ्यांकरिता चार महिन्यांचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि.8 )-** राज्यातील दुसरी ते पाचवीच्या अनेक विद्यार्थ्यांना आदल्या इयत्तेतील धड्याचे किमान वाचन आणि किमान बेरीज-वजाबाकी येत नसल्याचे शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने मान्य केले आहे. त्यामुळेच अशा विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नास आणि असर यांसारख्या राष्ट्रीय व राज्य स्तरांवरील विविध सर्वेक्षणांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीची जी वस्तुस्थिती दर्शविण्यात आली आहे, त्यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारत सरकारने निपुण भारतअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता दुसरीपर्यंत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यातील दुसरी ते पाचवीच्या वर्गातील शालेय विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढवण्यासाठी हा कृती कार्यक्रम 5 मार्च ते 30 जून या कालावधीत राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शिक्षकांनी दिलेल्या नमुन्यानुसार अपेक्षित अध्ययन क्षमतांची स्तरनिहाय पडताळणी करावयाची आहे.

त्यानुसार अपेक्षित क्षमता नसलेल्या विद्यार्थ्यांना त्या क्षमता प्राप्त करण्यासाठी स्वतऱ्चा विद्यार्थीनिहाय कृती कार्यक्रम आखायचा आहे. 30 जून पर्यंत दुसरी ते पाचवीच्या वर्गातील वर्गनिहाय किमान 75 टक्के विद्यार्थी अपेक्षित सर्व अध्ययन क्षमता प्राप्त करतील, याची खात्री प्रत्येक शिक्षकाने करावयाची आहे.

विद्यार्थ्यांनी ही कौशल्ये प्राप्त करावीत यासाठी शालेय वेळेव्यतिरिक्तचा वेळ शिक्षकांनी वापरावा. याच कालावधीत मे महिन्याचीही सुट्टीही येत असल्याने सुट्टीतही अशा विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबाबत संबंधित शाळा मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी नियोजन करावे अशाही सुचना आहेत.



### सुटीतील कार्यक्रमाला शिक्षकांचा विरोध

असर ही संस्था स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना व शिक्षकांची बदनामी करत आहे. त्यांना नवनविन उपक्रम आणुन शासनाकडून निधी उकळायचा असतो, म्हणून अश्या संस्था शासनाने ठेऊ नये. शासनाने आपल्या पर्यवेक्षिय यंत्रणेवर विश्वास ठेवावा. त्यांची रीक्त पदे भरावी. अनेक जिल्हात शिक्षणाधिकारी ते पात्र मुख्याध्यापकांची पदे रीक्त आहे. त्याचा अतिरीक्त भार शिक्षकांवर आहे. म्हणुन उन्हाळ्याच्या सुटितील या कार्यक्रमाला शिक्षकांचा विरोध होण्याची चिन्हे आहेत.

# पंचवटी ते राजपूत ढाबा उड्डाणपूलासाठी 1300 कोटींचा प्रस्ताव

## आ. सुलभा खोडकेंची अधिवेशनात लक्षवेधी ■ केंद्राकडे पाठपुरावा करण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.8 ) -** अमरावती शहरातील पंचवटी चौक ते अचलपूर मार्गावरील राजपूत ढाबा या मार्गावर उड्डाणपूलाच्या निर्मितीसाठी 1300 कोटी रुपयांचा प्रस्ताव असून त्याला मंजूरी मिळाली अशी मागणी करित अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली. वर्ष 2024-25 च्या वार्षिक पुरवणी मागणीवर चर्चा करतांना त्यांनी हा मुद्दा उचलला.



सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाने केंद्रीय परिवहन व राज्यमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या उड्डाणपूलासाठी पाठपुरावा करावा व केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत 1300 कोटींचा निधी मंजूर करून देण्यात यावा, अशी विनंती सुद्धा सुलभा खोडके यांनी केली. या चारपदरी उड्डाणपूलाच्या निर्माणासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडतांना सुलभा खोडके म्हणाल्या की, हा रस्ता राज्यमार्ग क्रमांक 14 व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 ला जोडण्यात आला आहे. तसेच पंचवटी चौक ते राजपूत ढाबा पर्यंतच्या मार्गावर शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन तसेच शाळा, महाविद्यालय, कॉन्व्हेंट आहे. याच मार्गावर संत गाडगे महाराज यांचे समाधी मंदिर आहे. त्यामुळे नेहमीच सर्व प्रकारच्या वाहनांची मोठी रहदारी असते.

रस्त्यावर अपघातविरहित वाहतूक व सुरक्षित अवागमनाची व्यवथा करणे आवश्यक आहे. याच मार्गावर रहिवासी क्षेत्र सुद्धा असून हा मार्ग पुढे तालुक्यांच्या शहरांना जोडल्या गेला आहे. त्यांनी वाहतूक नियंत्रणाची दीर्घकालीन उपाययोजना व्हावी, म्हणून पंचवटी चौक ते राजपूत ढाबा पर्यंत चारपदरी उड्डाण पूल साकारणे अतिआवश्यक असल्याबाबत सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहाला अवगत केले.

पंचवटी चौक ते राजपूत ढाबा पर्यंत चारपदरी उड्डाणपूल बांधण्याच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावास राज्य शासनाने मंजुरी देऊन केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत 1,300 कोटींच्या निधीसाठी राज्य शासनाने केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करण्याची विनंती सभागृहाला केली. निधी मंजूर करण्याची मागणी आमदार महोदयांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनातून केली आहे.

### केस पकडून महिलेला मारहाण

**अमरावती -** महिलेचा विनयभंग करून तिचे केस पकडले आणि तिला मारहाण केली. ही घटना तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत 7 मार्च रोजी उघडकीस आली. 34 वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी आरोपी दिलीप लक्ष्मण कठाणे (55, रा. फत्तेपूर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

### महिलेजवळील 50 हजाराची रोख लंपास

**अमरावती -** दर्यापूर ते खांमगाव बॅकेदरम्यान एका महिलेजवळील 50 हजाराची रोख चोराने लंपास केली. मंदा धर्मरक्षक तायडे (48, रा. जितापूर, खल्लार) यांनी या घटनेची तक्रार 7 मार्च रोजी दर्यापूर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पुढिल तपास पोलिस करीत आहे.

### डॉ. विजयराव पवार यांचे निधन

**दर्यापूर -** दर्यापूर पंचायत समिती चे माजी सभापती तथा नांदेड बुद्रुक चे माजी सरपंच डॉक्टर विजयराव पवार यांचे सात मार्चला नागपूर येथे दुःखद निधन झाले.



त्यांचेवर त्यांच्या गावी नांदेड बु येथे शनिवारी (दि.8) अत्यंसंस्कार करण्यात आले.

# ईव्हीएममधील घोळामुळेच काँग्रेसची वाताहत

### बबलू देशमुख यांचा आरोप

### दर्यापूरात काँग्रेसची बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.8 ) -** यावेळी काँग्रेस पक्षाची अमरावती जिल्ह्यात जी वाताहत झाली. तेवढी विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात कधीच झाली नव्हती. पक्षाचा एकही आमदार निवडून येउ शकला नाही. मागच्या दोन्ही निवडणुकांमध्ये दमदार कामगिरी केल्यानंतरही यावेळी काँग्रेसची घोर निराशा झाली, यासाठी सत्ताधार्यां कडून ईव्हीएम मशिनमध्ये करण्यात आलेला घोळ कारणीभूत असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला. दर्यापूर येथे पार पडलेल्या तालुका काँग्रेस कमेटीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना बबलू देशमुख बोलत होते.

विधानसभा निवडणुकीत राज्यात अनेक ठिकाणी काँग्रेसची परिस्थिती भक्कम होती. पक्षाचे उमेदवार हमखास निवडून येणार असे वाटत असताना ईव्हीएम मशिनमध्ये फेरफार करुन पक्षाचा विजय हिरावून घेतला गेला. सत्ताधारी आणि निवडणूक आयोगाने रचलेले हे षडयंत्र होते, असे बबलू देशमुख म्हणाले. खासदार बळवंत वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकडे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषी भवनात या बैठकीचे आयोजन केले होते. दर्यापूरातील विकास कामांसाठी मंजूर झालेला 33 कोटी रुपयांचा निधी शासनाच्या हेकेखोरपणामुळे अडकला असल्याने ही कामे प्रलंबित असल्याचे, खासदार बळवंत वानखडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

सुरुवातील छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना अब्दुल कलाम आझाद, इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकडे यांनी केले. या बैठकीत काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष कांचनमाला गावंडे, सुनील गावंडे, विजय विल्हेकर, नितेश वानखडे, जयश्री चव्हाण, नाना धाबे, पवनराजे वानखडे यांनीही मार्गदर्शन केले. संचालन अनिल भारसाकडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप बापू देशमुख यांनी केले. यावेळी माजी सभापती राजु कराळे, गजानन जाधव, प्रभाकर कोरपे, महिला तालुकाध्यक्ष शुभांगी भदे, संजू बेलोकार, जम्मू, रफिक, जहीर, सुनील डोंगरदिवे, राजीक आदी उपस्थित होते.

# सारडा महाविद्यालयात डॉ. पवन राउत यांचे व्याख्यान

### संविधान गौरव महोत्सवाअंतर्गत आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.8 ) -** अंजनगाव सुर्जीच्या श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवाअंतर्गत संविधानाचे महत्त्व या विषयावर राज्यशास्त्र विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पवन राऊत यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेविषयी विद्यार्थ्यांना महत्त्वाची माहिती विशद केली.



मानवी जीवनात संविधानाचे महत्त्व किती आहे याविषयी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. महेंद्र गिरी यांनी संविधानाविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे हे होते. याप्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कविता मालोकार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ. नितिन सराफ तर प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेंद्र किन्हीकर यांनी केले. याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ. अंशुमती कहाने, डॉ. प्रतिभा थोरात, डॉ. ताई ऊके, डॉ. इंदल जाधव, डॉ. चतुरानंद केदार, प्रा. सतीश बेलसरे, डॉ. प्रवीण अढाऊ, प्रा.आनंद थोरात प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छाया नायडकर, दीपमाला बेलसरे यांनी प्रयत्न केले.

# विटभट्टयांमध्ये प्लास्टिकचा वापर ठरतोय धोकादायक

## अंजनगाव परिसरात प्रदूषणात वाढ | सार्वजनिक आरोग्य संकटात

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.8 )-** अंजनगाव बारी परिसरातील वीटभट्टयांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा वापर होत असून त्यामुळे संपूर्ण परिसरात विषारी धूर पसरत आहे. त्यातून वातावरणात प्रदूषण प्रचंड वाढले असून सार्वजनिक आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिक, वाहनचालक व लहान मुलांमध्ये विविधा आजारांच्या प्रामुख्याने श्वसनाशी संबंधित आजारांच्या समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे हा धोकादायक प्रकार तातडीने थांबविण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



अंजनगाव बारी परिसरात मोठ्या संख्येने वीट भट्टया आहेत. व्यवसायीक भट्टी पेटवतांना प्लास्टिक साधनांचा वापर करतात. यामध्ये खराब तुटलेले टायर जाळल्याने त्यातून विषारी घुर निघतो आणि तो परिसरात सर्वत्र पसरत आहे. हा विषारी धूर लोकांच्या आरोग्यासाठी घातक ठरत असून श्वसनासह अन्य समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. श्वसनासंबंधी विकार, सतत खोकला, दमा, ॲयलर्जी यांसारख्या आजारांनी अनेक लोक ग्रस्त झाले आहेत. विशेषत- लहान मुले, वृद्ध आणि शारीरिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या नागरिकांना याचा अधिक त्रास जाणवत आहे. शिवाय धुळीमुळे वाहन चालकांना आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाणार्यान विद्यार्थ्यांना देखील त्रास होत आहे. या प्रकाराबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला असून त्याला आळा घालण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### उडत्या राखेमूळे आरोग्य धोक्यात

यासोबतच स्थानिक अंजनगाव बारी-बडनेरा तसेच सभोवताली गावालगत असलेल्या विटभट्टयांमधून वाहुन नेल्या जाणार्याव राखेची समस्याही गंभीर बनली आहे. डंपरमधून राख वाहून नेताना ती हवेत उडते. त्यामुळेही सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच ही उडालेली राख वाहनचालकांच्या डोळ्यात जूवन अपघातही घडले आहे. प्रशासनाला या समस्यांबाबत अवगत करण्यात आले असले तरी तहसीलदार दुर्लक्ष करुन व्यावसायिकांना आर्थिक लाभापोटी पाठबळ देतात, असा नागरिकांचा आरोप आहे.

# मंत्री संजय राठोड यांचा सपत्नीक सत्कार

● नांदुरा पिंगळाईत यात्रा महोत्सव व बंजारा मेळावा
● संत चंपालाल महाराज देवस्थानात आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.8 )-** अमरावती तालुक्यातील नांदुरा पिंगळाईच्या श्री संत चंपालाल महाराज देवस्थानात यात्रा महोत्सव व भव्य बंजारा मेळावा नूकताच मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी राज्याचे मंत्री संजय राठोड व त्यांच्या पत्नी शितल राठोड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी श्री संत चंपालाल महाराज संस्थानच्या वतीने संजय राठोड यांचा सत्कार करण्यात आला.



संस्थानचे अध्यक्ष पंडित राठोड व सचिव जग्गू राठोड तसेच संचालक रमेश राठोड, कळचंद राठोड, हरिचंद्र राठोड, लचिराम महाराज, रावसिंग महाराज, शेषराव जाधव, हेमराज जाधव, राजू चव्हाण, रविकांत वानखडे, संदीप गिरासे, उद्योजक श्याम देशमुख, सुनील राणा हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक प्राचार्य प्रल्हादराव चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन किशोर राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री संत चंपालाल महाराज संस्थान पंच कमिटी व दया राठोड, सचिन राठोड, विजय जाधव, गिरधर राठोड, देवानंद राठोड आदींनी परिश्रम घेतले.